आजचा शुभ विचार

“"बुद्धिमत्तेचा विकास हे मानवी अस्तित्वाचे अंतिम लक्ष्य असले पाहिजे"आपण नेहमी काहीतरी शिकत राहिले पाहिजे. आपले ज्ञान वाढविण्यावर भर दिला पाहिजे"

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!






मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-19 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thuseday 20 May 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक १९ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ मंगळवार, दि. २० मे २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


## सावधान, कोरोना परत येतोय; चीनच्या हाँगकाँगमध्ये आढळले रुग्ण

विशेष वृत्तसेवा
दैनिक स्वराज्यदूत-

----------------------

कोरोना या संसर्गजन्य आजाराने काही वर्षांपूर्वी धुमाकूळ घातला होता. आजाराची सुरुवात चीनमधील वुहानमधून झाली होती. आता पुन्हा एकदा चीनमधूनच कोरोना संकट आले आहे. यावेळी चीनमधील हाँगकाँग मधून कोरोना पसरण्यास सुरुवात झाली आहे. सिंगापूर या देशातही कोरोनाचे रुग्ण आढळू लागले आहेत. आशियाई देशांमध्ये मागील काही दिवसांपासून कोविड रुग्ण आढळत आहे. सिंगापूरमध्ये चौदा हजारांपेक्षा जास्त तर चीनमधील हाँगकाँगमध्ये ८०



पेक्षा जास्त वृद्ध कोविड पॉझिटिव्ह आढळले आहेत. हाँगकाँगमध्ये कोरोनामुळे ३० वृद्धांचा मृत्यू झाला आहे. यामुळे हाँगकाँगमध्ये कोविड अलर्ट जाहीर झाला आहे. वृद्धांना घरातच राहण्याचे आणि तब्येतीची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. थायलंडमध्ये कोरोना रुग्ण आढळण्यास सुरुवात झाली आहे. भारत सरकारच्या डॅशबोर्डनुसार देशात २५७ कोविड ॲक्टिव्ह रुग्ण आढळले आहेत. या रुग्णांवर उपचार सुरू आहेत. देशात आढळलेले कोविड रुग्ण उपचारांनी बरे होतील अशा स्थितीतले आहेत. सर्व रुग्णांवर उपचार सुरू आहेत. सनरायझर्स हैदराबाद या आयपीएल संघाचा सलामीवीर ट्रॅव्हिस हेड यालाही कोरोना झाला आहे. तो सोमवारी लखनऊ सुपर जायंट्स विरुद्ध खेळणार नाही. सध्या ट्रॅव्हिस हेडवर उपचार सुरू आहेत. ट्रॅव्हिस हेडने २०२५ च्या आयपीएलमध्ये ११ सामन्यांमध्ये २८.१० च्या सरासरीने आणि १५६.११ च्या स्ट्राईक रेटने २८१ धावा केल्या आहेत. या हंगामात त्याने दोन वेळा अर्धशतके केली आहेत. याआधी २०२४ मध्ये त्याने १५ सामन्यांत ४०.५० च्या सरासरीने आणि १९१.५५ च्या स्ट्राईक रेटने ५६७ धावा केल्या होत्या. कोरोना संदर्भात बातम्या येऊ लागताच पुन्हा एकदा नागरिकांना लॉकडाऊनची चिंता सतावू लागली आहे. अद्याप सरकारने लॉकडाऊनची घोषणा केलेली नाही. नागरिकांनी घाबरू नये पण डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय उपचार करुन घेऊ नये आणि तब्येत बिघडल्यास मास्क घालून डॉक्टरांना भेटावे असे आवाहन सरकारकडून करण्यात आले आहे.

## सोफिया कुरेशींचा अपमान करणाऱ्या विजय शाह यांना सर्वोच्च न्यायालयाने सुनावले खडे बोल

विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबाबत अपमानजनक वक्तव्य करणारे मध्यप्रदेशचे मंत्री विजय शाह यांची माफी सर्वोच्च न्यायालयाने नाकारली आहे. मगरीचे अश्रू ढाळू नका असं म्हणत सर्वोच्च न्यायालयाने विजय शाह यांना खडे बोल सुनावले आहेत. विजय शाह यांनी वादग्रस्त वक्तव्य करुन नंतर माफी मागितली होती. तसंच हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं होतं. मात्र आता विजय शाह यांची माफी मान्य नाही म्हणत सर्वोच्च न्यायालयाने त्यांना सुनावलं आहे.

**प्रकरण उच्च न्यायालयातून सर्वोच्च न्यायालयात**

सोफिया कुरेशींबाबत वादग्रस्त वक्तव्याचं प्रकरण मध्य प्रदेश उच्च न्यायालयात गेल्यानंतर उच्च न्यायालयाने एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले होते. हा आदेश रद्द करण्याची विनंती विजय शाह यांच्यातर्फे सुप्रीम कोर्टाकडे करण्यात आली होती. मात्र आता या प्रकरणी माफी



मागितली आहे वगैरे सांगत मगरीचे अश्रू ढाळू नका असं सर्वोच्च न्यायलायने म्हटलं आहे.

**न्यायाधीश सूर्यकांत काय म्हणाले?**

शाह यांचे वकील म्हणाले की माझे अशील विजय शाह यांनी माफी मागितली आहे. त्यावर जस्टिस सूर्यकांत म्हणाले ही कुठल्या प्रकारची माफी आहे? तुम्ही एक पब्लिक फिगर आहात. बोलताना शब्द तोलून मापून बोलणं हे तुमचं काम आहे. आम्हाला असल्या माफीची आवश्यकता नाही. आम्ही कायदेशीर कारवाई करु म्हणून तुम्ही माफीनामा दाखवत आहात. आम्ही या प्रकरणी विशेष तपास समिती तयार करण्याचे आदेश देत आहोत. ज्यामध्ये आयपीएस दर्जाचे तीन अधिकारी असतील. हे तिन्ही अधिकारी मध्य प्रदेशाच्या बाहेरचे असतील. जे काही विजय शाह बोलले आहेत त्याचा परिणाम त्यांना भोगावा लागेल. विशेष तपास समितीने त्यांचा अहवाल २८ मे पर्यंत द्यावा असेही निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

**विजय शाह यांनी व्यक्त केली दिलगिरी**

विजय शाह यांनी दिलगिरी व्यक्त केली आणि म्हणाले, “नुकतेच मी जे वक्तव्य केले, त्यामुळे प्रत्येक समाजाच्या भावना दुखावल्या आहेत. या वक्तव्यामुळं केवळ मी मनाने मी व्यथितच झालो नाही तर दुःखी देखील झालो आहे. मी माफी मागत आहे.” विजय शाह यांनी सोफिया कुरेशी या देशाच्या भगिनी आहेत असे म्हटले आहे. ते म्हणाले, “त्यांनी राष्ट्र धर्माचे पालन करताना जात आणि समाजाच्या वर जाऊन काम केले आहे. आपल्या सख्ख्या बहिणीहून त्या अधिक सन्मानास पात्र आहेत.” असंही म्हटलं होतं. मात्र आता सर्वोच्च न्यायालयाने मगरीचे अश्रू ढाळू नका म्हणत त्यांना झापलं आहे.

**विजय शाह काय म्हणाले होते?**

मंत्री शाह यांनी एका सभेत बोलताना कुरेशी यांचा उल्लेख 'दहशतवाद्यांची बहीण' असा केला होता. याचा व्हिडीओ समोर आल्यानंतर सर्व स्तरातून त्यांच्यावर टीका करण्यात आली. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात सुरू केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' बाबत देशवासीयांना वेळोवेळी माहिती देणार्या कर्नल सोफिया कुरेशी या विंग कमांडर व्योमिका सिंह आणि परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री माहिती देत होते. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं. त्यानंतर आता सर्वोच्च न्यायालयाने त्यांना सुनावलं आहे.

## पाकिस्तानवर IMF ने लादल्या नव्या 11 अटी

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

----------------------

पाकिस्तान आणि दहशतवाद हे दोन्ही समानार्थी शब्द झाले आहेत. पाकिस्तान आजही दहशतवाद्यांची पाठराखण करत आहे. दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या पाकिस्तानला आर्थिक मदत देऊ नये अशी ठाम भूमिका भारताने घेतली आहे. भारताच्या भूमिकेचा आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अर्थात इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाच्या (आयएमएफ) निर्णय प्रक्रियेवर परिणाम झाल्याचे दिसत आहे. आयएमएफने काही दिवसांपूर्वी जाहीर केलेली आर्थक मदत हवी असल्यास नव्या ११ अटी आणि जुन्या अटी अशा एकूण ५० अटींचे पालन करण्याचे बंधन पाकिस्तानवर घातले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात तणाव वाढला आहे. हा तणाव निवळावा यासाठी पाकिस्तानने ठोस उपाय करणे अपेक्षित आहे. अन्यथा या



तणावामुळे आयएमएफकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीवर परिणाम होऊ शकतो, असा इशाराही पाकिस्तानला देण्यात आला आहे. पाकिस्तानने देशाचा १७.६ ट्रिलियन रुपयांचा अर्थसंकल्प संसदेतून मंजूर करुन घ्यावा अशी अट आयएमएफने पाकिस्तानला घातली आहे. वीज बिलांवरील कर्ज सेवा अधिभारात वाढ आणि तीन वर्षांपेक्षा जास्त जुन्या वापरलेल्या कारच्या आयातीवरील निर्बंध उठवणे या अटीही आयएमएफने पाकिस्तानला घातल्या आहेत. पाकिस्तानच्या अर्थसंकल्पात विकासनिधी म्हणून १.०७ ट्रिलियन रुपयांची तरतूद करण्याला आयएमएफने परवानगी दिली आहे. तसेच पाकिस्तानला संरक्षणासाठी जास्तीत जास्त २.४१४ ट्रिलियन रुपयांची तरतूद करण्याला आयएमएफने परवानगी दिली आहे. नवीन कृषी उत्पन्न कर कायदे लागू करा आणि कर रचनेत सुधारणा करा तसेच प्रशासकीय कामकाजात सुधारणा करा असे निर्देश आयएमएफने पाकिस्तानला दिले आहेत. पाकिस्तान सरकारने २०२७ पर्यंतचे आर्थिक नियोजन निश्चित करुन कळवावे, असेही आयएमएफने पाकिस्तानला सांगितले आहे. तसेच २०२८ पासून पाकिस्तान वाढत्या अनुत्पादक खर्चांना लगाम घालण्यासाठी नियामक संस्थेद्वारे काय उपाय करणार याची लेखी माहिती आयएमएफने मागवली आहे. पाकिस्तान सरकारने १ जुलै २०२५ पर्यंत वार्षिक वीज दर पुनर्नियोजनाचे नवे आदेश जारी करावे. १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत खर्च पुनर्प्राप्ती पातळीवर ऊर्जा दर राखण्यासाठी अर्धवार्षिक गॅस दर समायोजनाची अधिसूचना देखील जारी करावी; अशा अटी आयएमएफने घातल्या आहेत. कॅप्टिव्ह पॉवर लेव्हीचे पाकिस्तानने मे महिन्यातच कायद्यात रुपांतर करावे, असेही आयएमएफने सांगितले आहे. कर्ज सेवा अधिभारावरील कमाल ३.२१ रुपये प्रति युनिट मर्यादा काढून टाकण्यासाठी संसदेने जूनपर्यंत कायदा करावा, असेही आयएमएफने सांगितले आहे.

## जालना जिल्ह्यातील अपघातात माय – लेकीचा जागीच मृत्यू

दिपक रोकडे
जालना प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------

सोलापूर ते धुळे राष्ट्रीय महामार्गावर सोमवारी जालना जिल्ह्यातील सौंदलगाव फाट्याजवळ झालेल्या अपघातात माय-लेकीचा जागीच मृत्यू झाला असून तिघे गंभीर जखमी झाले आहेत. रोहिणी अमरदीप चव्हाण (30) आणि नुरवी अमरदीप चव्हाण (अडिच वर्षे) अशी या



अपघातात मृत्युमुखी पडलेल्या माय-लेकींची नावे आहेत. या अपघातात अमरदीप बाबूराव चव्हाण (४०), विश्रांती प्रदीप चव्हाण (२९) आणि रुद्रांश प्रदीप चव्हाण (2 वर्ष) हे तिघे जखमी झाले आहेत . अपघाताची माहिती मिळताच परिसरातील रहिवाश्यांनी धाव घेतली आणि त्यांच्या मदतीने जखमींना जवळ असलेल्या पाचोड गावातील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. अपघाताचे नेमके कारण अद्याप अधिकृतरित्या समजू शकले नाही. परंतु कारवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे . कार उलटल्याने हा अपघात घडला असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या अपघातात कारच्या समोरील भागाचा चुराडा झाला आहे.


अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या

दैनिक स्वराज्यदूत

या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी

आजच संपर्क करा ८४४६६७३६७७


## ब्हाणपूर बाजार समितीत केळीचे भाव कमी करण्याचे षडयंत्र ? शेतकऱ्यांना क्विंटलमागे ५०० रुपयांचा फटका

**संदीप पाटील**
**जळगाव प्रतिनिधी**
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------

देशांतर्गत मागणी, निर्यातीला चालना आणि नैसर्गिक आपत्तीने झालेल्या नुकसानीमुळे सध्या सगळीकडे केळीचा तुटवडा असून, भावातही तेजी आहे. असे असताना मध्य प्रदेशातील ब्हाणपूर बाजार समितीत केळीचे भाव मुद्दाम कमी करण्याचे षडयंत्र संबंधित यंत्रणेकडून रचण्यात आल्याची शंका शेतकऱ्यांना आहे. दोनच दिवसात क्विंटलमागे सुमारे ५०० रुपयांचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसला आहे. खान्देशातील जळगावसह धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यात उत्पादित होणाऱ्या केळीचे भाव ठिठिकाणच्या स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडून दररोज जाहीर केले जात असले, तरी व्यापारी मध्य प्रदेशातील ब्हाणपूर बाजार समितीकडून काढले जाणारे भाव प्रमाण मानतात. याव्यतिरिक्त संपूर्ण देशातील व्यापाऱ्यांचेही ब्हाणपूरच्या केळी भावाकडे लक्ष असते. त्यामुळे ब्हाणपूरमध्ये केळीच्या भावात थोडाजरी चढ-उतार झाला तरी संपूर्ण देशभर त्याचे पडसाद उमटतात. याच गोष्टीचा फायदा उचलून ब्हाणपूर बाजार समितीत सध्या मनमानी पद्धतीने केव्हाही आणि कितीही केळीचे भाव वाढविण्याचे आणि कमी करण्याचे उद्योग तिथे बसलेली यंत्रणा करत असल्याने केळी उत्पादकांना मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे. दोन दिवसातील केळी भावाची आकडेवारी लक्षात घेता, शुक्रवारी ब्हाणपूरमध्ये केळीचे भाव ३०३५ रुपये प्रतिक्विंटलपर्यंत पोहोचले होते. परंतु,



दुसऱ्याच दिवशी शनिवारी केळीचे भाव २५०० रुपयांपर्यंत खाली आले. रविवारी पुन्हा त्यात ५० रुपयांची घट झाली.

**एका गाडीमागे ७५ हजार रुपयांची झळ**

सध्याची स्थिती लक्षात घेता केळीचे भाव क्विंटलमागे एकदम ५०० रुपयांनी घसरल्यानंतर शेतकऱ्यांना एका गाडीमागे (१५० क्विंटल) सुमारे ७५ हजार रुपयांची आर्थिक झळ बसली आहे. भाव वाढत असताना शेतकरी आणखी चांगल्या भावाच्या आशेने इतके दिवस केळीची कापणी करत नव्हते. मात्र, दोनच दिवसात ५०० रुपयांनी भाव कमी झाल्यानंतर शेतकरी आता आणखी भाव कमी होण्याच्या भीतीने केळी कापणीसाठी घाई करू लागले आहेत. त्याचा फायदा व्यापाऱ्यांनाच जास्त करून होत आहे.

**ब्हाणपूर कृषी उत्पन्न बाजार समितीत जर कोणी जाणुनबुजून केळीचे भाव कमी-जास्त करत असेल तर ते चुकीचे आहे. संबंधित यंत्रणेवर लक्ष ठेवण्यासाठी एक जबाबदार अधिकारी तिथे तातडीने नियुक्त केला जाईल.-**

**हर्ष सिंह (जिल्हाधिकारी, ब्हाणपूर, मध्य प्रदेश)**

------------------------------------------

**ब्हाणपूर बाजार समितीत सध्या केळीचे दररोज भाव काढले जातात. त्याऐवजी १० दिवसातून एकदाच भाव काढण्यात यावे. जेणेकरून केळीचे भाव काही दिवस स्थिर राहतील. शेतकऱ्यांनाही चढ-उतारामुळे होणाऱ्या नुकसानीचा फटका बसणार नाही.-**

**अतूल पाटील**
**(केळी उत्पादक, केऱ्हाळे, ता.रावेर, जि.जळगाव)**

संपादकीय

# सर्व पक्षीय शिष्टमंडळ, भारताची एकजूट

पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी भारतीय महिलांच्या कपाळाचे कुंकू पुसल्याबद्दल त्यांना अद्दल घडवण्यासाठी मोदींनी पाकविरुद्ध जोरदार युद्धसदृष्य हालचाली केल्या आणि शंभर दहशतवाद्यांना कंठस्नान घातले. मुरीदके, बहावलपूर आदी ठिकाणच्या दहशतवादी अड्ड्यांवर लष्कराने जोरदार हल्ले चढवून दहशतवाद्यांना ठार केले. त्यातच कंदाहार येथील विमान अपहरण प्रकरणात हवा असलेला दहशतवादी अझर मसूद याचे कुटुंबीय मुरीदके येथील हल्ल्यात ठार झाले. लष्कराच्या हल्ल्यात पाकचे दहशतवादी आणि पाकचे सैनिकही ठार झाले आणि पाकला चांगलाच धडा शिकवला गेला. पाकने शरणागती पत्करली आणि पाक दाती तृण धरून शरण आला. पण मोदी यांनी आता पाकला राजनैतिक पातळीवरही नामोहरम करण्याचे धोरण स्वीकारले आहे आणि त्यांनी हा राजनैतिक सर्जिकल स्ट्राईक अत्यंत जोरदार केला आहे.

पाकचे प्रथम पाणी बंद केले, नंतर पाकला जाणारी निर्यात थांबवली आणि आता तर तुर्कस्थानला धडा शिकवला आहे कारण त्याने पाकला मदत केली याचे प्रायश्चित्त त्याला देण्यात आले आहे. त्याच्याशी सर्व प्रकारचे संबंध तोडून आणि त्याच्याशी असलेले आर्थिक संबंध तोडून पण पाकसाठी हे पुरेसे नाही, कारण पाक कधीही आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताला काही करू शकत नसला तरीही भारताला त्रास देत रहाणार हे ओळखून मोदी यांनी आता हा राजनैतिक ऑफेन्सिव्ह म्हणजे पाकचे सर्वकंष पर्दाफाश करण्याचा निर्णय घेतला आहे. हा मोदी यांचा मास्टर स्ट्रोक आहे. या सीझफायरमध्ये भारत ड्रोन्स किंवा क्षेपणास्त्रे डागणार नाही, तर पाकला पुरता एक्सपोझ करणार आहे. भारत आता सात उच्च शक्तीशाली पक्षांची शिष्टमंडळे जगातील विविध प्रमुख देशांना पाठवणार आहे आणि त्यांना हे पटवून देणार आहे की भारत हाच पाक पुरस्कृत दहशतवादाचा शिकार झालेला देश आहे. या शिष्टमंडळाचे नेतृत्व चार एनडीएचे खासदार आणि तीन विरोधी पक्षांचे खासदार करणार आहेत. हे शिष्टमंडळ जगातील प्रमुख आंतरराष्ट्रीय राजधान्यांमध्ये जाऊन सीमावर्ती दहशतवादाविरोधात प्रबळ सहमती तयार करण्याचा प्रयत्न करेल. या डावपेचात्मक चालीमागे भारताची राष्ट्रीय ऐक्य जगासमोर एकसंधपणे आणण्याचा हेतू तर आहेच पण असा एक संदेश जगभर देण्याचा प्रयत्न आहे की, भारत यापुढे कोणत्याही प्रकारचा दहशतवाद सहन करणार नाही आणि जागतिक नेत्यांनी याची दखल घ्यावी. यामुळे जागतिक नेते भारताच्या या कृत्याची दखल घेऊन पाकविरोधात ही भारताची पुढील कृती विचारात घेतील आणि पाकच्या कोणत्याही दुस्साहसाला पाठिंबा देणार नाहीत.

सर्व पक्षीय शिष्टमंडळ भारताची राष्ट्रीय सहमती आणि दहशतवादाला कोणत्याही स्वरूपात मुकाबला करण्याचे भारताचे धोरण जगासमोर आणतील. दहशतवाद कोणत्याही स्वरूपातील आणि आविष्कारातील हा भारतासाठी अस्वीकारार्ह आहे हे पटवण्याचा हे नेते करतील. देशाचा जो संदेश आहे की, कोणत्याही प्रकारचा दहशतवाद सहन करणार नाही हा संदेश जगाला देतील. दुसरे म्हणजे देशांतर्गत लोकांना भारताच्या या कृतीत सर्व पक्ष सहभागी आहेत हा एक मोठा संदेश देण्याचा प्रयत्न मोदी सरकारचा आहे. हा अतिशय स्तुत्य प्रयत्न आहे. कारण विरोधी पक्षांकडून सरकारवर जी संभाव्य टीका होणार आहे ती आपोआपच खाली बसेल आणि सरकारविरोधात आक्षेप घेणाऱ्यांना परस्परच उत्तर मिळेल. ऑपरेशन सिंदूरनंतर भारतीयांची सूडाची इच्छा काही अंशी पूर्ण झाली आहे पण भारतातील काही 'आस्तिनके साप' आहेत त्यांची वळवळ या निमित्ताने समोर आली होती. ती आता थंड होणार आहे. त्यातल्या त्यात अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थी केली असा जो आरोप मोदी सरकारवर केला जातो तो धुऊन काढण्याचा सरकारचा निर्धार आहे आणि तो या कृतीने बराचसा साध्य होणार आहे. या पूर्वीही भारताने असाच प्रयोग केला होता आणि भारतातील राजकीय पक्ष संकटाच्या समयी एक होतात असा जो संदेश गेला होता त्याला पुष्टी मिळाली आहे.

या आधी तत्कालीन पंतप्रधान नरसिंह राव यांनी जिनिव्हाला पाठवण्यासाठी शिष्टमंडळाच्या नेतेपदी तत्कालीन विरोधी पक्ष नेते अटलबिहारी वाजपेयी यांची निवड केली होती. पाकने आणलेल्या ठरावावर भारताची भूमिका प्रबळपणे मांडण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघात भारताची भूमिका अधिक प्रबळ करण्यासाठी १९९४ मध्ये हे शिष्टमंडळ जिनिव्हाला गेले होते. या शिष्टमंडळात तेव्हाचे काश्मीरचे मुख्यमंत्री आणि सध्याचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला याचे वडील, सलमान खुर्शिद आणि मनमोहन सिंग तसेच ई अहमद यांचा समावेश केला होता. तोच संदेश मोदी सरकारने देण्याचा प्रयत्न केला आहे आणि यामुळे या शिष्टमंडळात शशी थरूर, रवीशंकर प्रसाद, संजय कुमार झा, वैजयंत पांडा, कनिमोझ, सुप्रिया सुळे आदींचा समावेश करणार आहे. या शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्यासाठी कॉंग्रेसचे शशी थरूर यांची निवड झाली आणि त्यामुळे राहुल गांधी याचा पोटशूळ उठला.

कारण कॉंग्रेसने मोदी सरकारच्या प्रत्येक निर्णयाला विरोध केला पाहिजे असे त्यांचे धोरण आहे, पण राहुल यांचे हे धोरण थरूर असोत की कॉंग्रेसला फारसे पसंत नाही, त्यामुळे थरूर हे शिष्टमंडळात सामील झाले आणि त्यांनी नेतृत्व करण्याचे मान्य केले आहे. पण ते असो. अशा संकट समयी तरी आपसतील मतभेद समोर आणू नयेत असे शिष्टाचार सांगतो. पण कॉंग्रेस आणि त्यापेक्षाही पाकिस्तानची भाषा बोलणाऱ्या राहुल यांना ते मान्य नाही. पण किरण रिजिजू म्हणाले ते या क्षणी महत्वाचे आहे. ते म्हणजे संकट समयी आम्ही एकजूट आहोत आणि हे जगाला दाखवण्याची हीच अत्यंत योग्य वेळ आहे. दहशतवादाबद्दल शून्य सहिष्णुता असा संदेश घेऊन हे शिष्टमंडळ महत्त्वाच्या ठिकाणी फिरणार आहे आणि ही बाब सर्वात महत्त्वाची आहे. प्रमुख भागीदार राष्ट्रांना भेट आणि भारताच्या राष्ट्रीय एक्याचे प्रतिबिंब मतभेदांच्या पलीकडे जाऊन आहे हे सर्वात महत्त्वाचे आहे. अशा अवघड समयी भारत एकजूट आहे हे जगाला दाखवणे जास्त महत्त्वाचे आहे.

# सासू- सासरे, मेहुणीच्या त्रासाला कंटाळून जावयाची गळफास घेऊन आत्महत्या

**विशेष प्रतिनिधी**
**दैनिक स्वराज्यदूत**

-------------------------

आपण सासूने किंवा सासरकडच्या लोकांने सुनेला त्रास दिल्याच्या अनेक घटना ऐकल्या असतील यातून पुढे विवाहितेने आत्महत्या केल्याच्या घटना घडतात ज्या खूपच दुर्दैवी आहे मात्र मालेगाव मध्ये सासू सासरे, मेहुणी यांनी त्रास दिल्याने जावयाने गळफास घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या



माहितीनुसार मृत दिपक दाभाडे यांचे तीन वर्षापूर्वी सख्या मामाची मुलगी आरती हिच्या बरोबर लग्न झाले होते (दि.१६ मार्च) रोजी मृत दिपक दाभाडे यांची पत्नी आरती ही माहेरी लग्नासाठी गेली असता ती परत आलीच नाही म्हणून मृत दिपक यांनी सासू सरला पवार, सासरे शंकर पवार व मेहुणी करीना साळुंखे यांना वारंवार फोन करत पत्नीला नांदवण्यास पाठवा असे सांगत असे परंतु सासू- सासरे , मेहुणी हे तिला नांदवण्यास पाठवत नसत तसेच काही ना काही कारणावरून मृत दिपक दाभाडे यास शिवीगाळ करत, भांडण करत, मानसिक त्रास देत असल्याने मृत दिपक यांने (दि.१७ एप्रिल) रोजी राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली आत्महत्या करण्यापूर्वी मृत दिपक दाभाडे यांनी चिठ्ठी लिहून ठेवली असून त्यात सासरे शंकर पवार, सासू सरला पवार, मेहुणी करीना भागवत साळुंके यांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करीत असल्याचे म्हटले आहे. याप्रकरणी मृत दिपक दाभाडे यांची बहीण मोहिनी शैले राहणार- वनसगाव तालुका निफाड यांनी छावणी पोलिसांकडे फिर्याद दिली असून छावणी पोलिसांनी आत्महत्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी सासू- सासरे व मेहूणी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक भगवान कोळी हे करीत आहे.

# यशोगाथा

## एका चहावाल्याच्या मुलाची प्रेरणादायी कथा

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------

अशोक लांडे याचे वडील शिरूर मध्ये एक लहानसं चहाचं दुकान चालवतात. आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नव्हती. घर चालवण्यासाठी व शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी अशोक ला शाळा सुटल्यानंतर व सुट्ट्यांमध्ये वडिलांना मदत करावी लागत असे. अनेक वेळा अभ्यासासाठी वेळच मिळत नसे, पण तरीही त्याने हार मानली नाही. सकाळी लवकर उठून तो आधी चहा टपरीवर वडिलांना मदत करत असे, नंतर



नाव – अशोक गजानज लांडे

शाळेला जात असे. शाळेनंतर पुन्हा संध्याकाळी दुकानावर काम. अशा कष्टमय दिनक्रमेमध्येही त्याची अभ्यासाची आवड कधीच कमी झाली नाही. वेळ काढून तो अभ्यास करत असे, शिक्षकांनी दिलेल्या मार्गदर्शनाचं तो काळजीपूर्वक पालन करत असे. परिक्षेच्या दिवसांत त्याने दुकानावर कामही केलं आणि अभ्यासावर लक्ष केंद्रीत केलं. त्याचे प्रयत्न आणि चिकाटीचं फळ त्याला मिळालं. *१०वीच्या परीक्षेत त्याने ९५ %* गुण मिळवले आणि आपल्या कुटुंबाचा, वडीलांचा आणि गावाचा अभिमान वाढवला. आज त्याच्या कष्टाला, स्वप्नांना आणि चिकाटीला सलाम केला जातो. त्याची यशोगाथा इतर अनेक गरिब पण मेहनती विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. त्याचा या यशाचा छोटासा सत्कार पुणे ज़िल्हा मध्य. सह बँक विभागीय कार्यालया तर्फे करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या

# छत्रपती संभाजी महाराजांचा आदर्श तरुण पिढीने घ्यावा - व्याख्याते समाधान हेंगडे पाटील

सुनील बाचरे
अंबरनाथ प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त १४ मे रोजी ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील आसनगाव येथे भव्य दिव्य शंभूराजे जन्मोत्सव सोहळयाचे आयोजन शंभू रुद्र ग्रुप व एकता मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले होते याप्रसंगी प्रमुख व्याख्याते म्हणून महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते श्री समाधान हेंगडे पाटील यांचे छत्रपती संभाजी महाराजांच्या धगधगत्या जीवन चरित्रावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते .व्याख्याते श्री समाधान हेंगडे पाटील म्हणाले की, छत्रपती संभाजी



महाराज हे धगधगते अग्नि कुंड आहेत आणि त्यांनी नऊ वर्ष औरंगजेबाशी लढा देऊन स्वराज्य रक्षणाचे कार्य केले ते साहित्यिक होते त्यांचा आदर्श आजच्या तरुण पिढीने घ्यावा आणि संभाजी महाराजांचे विचार आत्मसात करावे अशी विनंती त्यांनी उपस्थित जनसमुदायाला आणि तरुणांना केली. आसनगाव येथील भव्य दिव्य शंभू जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त शाहीर अजित भालके यांनी पोवाडा सादरीकरण केले त्यानंतर शंभूराजांच्या चरित्रावर हेंगडे पाटील यांचे व्याख्यान पार पडले याप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते याप्रसंगी युवा उद्योजक रोहनशेठ काठे, श्री आकाश पाटील, शंभू रुद्र ग्रुपचे अध्यक्ष गणेश जाधव, एकता मित्र मंडळाचे अध्यक्ष रमेश जगताप, नगरसेवक एकनाथ चंदे, श्री.उल्हास शिंदे, ज्ञानेश्वर जाधव,प्रसाद भानुशाली,उल्हास उगले, राहुल डमाळे, क्रांती बसापूरम, सचिन जाधव, निलेश जाधव, अविनाश गारे, हर्षल आंबेकर, अजय बोकड, सागर बोकड , सुनील नाडेकर, विनायक जाधव, रोशन जाधव, जगदीश हरड, समीर डोंगरे, दर्शन पोटकुले, श्याम डोळस, अंकुश तळपाडे, प्रशांत साबळे, सुहास धांडे, देविदास दराने, सागर भांगरे अशी विविध क्षेत्रातील प्रमुख मान्यवर मंडळी आणि जनसमुदायाच्या प्रचंड उत्साहात शंभू जन्मोत्सव कार्यक्रम पार पडला.

# महाराष्ट्रातअल्पसंख्यांक समाज राष्ट्रवादी सोबत यावा म्हणून आ इंद्रीस नायकवडी महाराष्ट्र पिंजून काढणार

## दौऱ्याला सुरुवात मुस्लिम समाजाचा उत्स्फूर्त प्रतिसाद

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------

धुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या सूचनेनुसार महाराष्ट्र राज्याचे विधान परिषदेचे आमदार.तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेशाध्यक्ष इंद्रीस भाई नायकवडी यांनी अल्पसंख्यांक समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाच्या कल्याणकारी योजना राबवण्यासाठी. पायाभूत सोयी सुविधा अल्पसंख्याक समाजाच्या प्रश्नावर विचार मंथन संघटना बांधणी.मजबूत करण्यासाठी राष्ट्रवादी पक्ष मजबुत व बळकटी करण्यासाठी व आगामी स्थानिक स्वराज्याच्या निवडणुकीची रणनीतीसाठी महाराष्ट्रा पिंजून काढणार आहेत येथे सुरुवात सोलापूर जिल्ह्यातून करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी




कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांचे विचारसरणी अल्पसंख्यांक समाजापर्यंत पोचविण्यासाठी व पक्षाचे ध्येय धोरण व अल्पसंख्यांक समाजासाठी राज्यात कल्याणकारी योजना ची माहिती देण्यासाठी यात मौलाना आझाद विकास महामंडळास मोठ्या प्रमाणात निधी विद्यार्थ्यांना साठी मटीची स्थापना करून मोठा दिलासा अल्पसंख्यांक समाजाला दिला आहे याचा प्रचार प्रसार होण्यासाठी महाराष्ट्र राज्याचा ३६ जिल्ह्याचा दौरा आमदार इंद्रीस भाई नायकवडी यांनी सुरु केला आहे यात दिनांक ५ मे सोलापूर जिल्ह्या ६मे धाराशिव उस्मानाबाद जिल्हा ७मे. लातूर जिल्हा ८मे नांदेड जिल्हा ९मे हिंगोली जिल्हा १० मे वाशिम जिल्हा ११मे अमरावती जिल्हा १२मे अकोला जिल्हा १३मे १४ मे जालना जिल्हा सह दहा जिल्ह्याचा दौरा पूर्ण केला आहे. राहिलेले २६ जिल्हा लगेच दौरा सुरुवात करणार आहेत यात आ नायकवडी यांनी अल्पसंख्यांक अनेक विविध पक्षाचे पदाधिकारी व माजी नगरसेवक सामाजिक कार्यकर्ते यांनी प्रवेश करून घेतला आहे. अल्पसंख्यांक समाजाचे प्रलंबित मागण्या व कब्रस्तान ईदगाह दर्गा चा विकास कामाची माहिती घेऊन आराखडा तयार करून न्याय मिळवून देण्याचे आश्वासन समाजाला दिले राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीत अल्पसंख्यांक समाजाला जोडण्यासाठी दौरा सुरू केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीला फायदा होईल यात आगामी होणाऱ्या महानगर पालिका २९ नगर पालिका २४४ जिल्हा परिषद ३४ पंचायत समिती २८९ नगरपंचायत ४१ निवडणुकीत अल्पसंख्यांक समाज अजित पवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहीला पाहिजे अशी भूमिका आमदार नायकवडीची आहे. यासाठी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढणार आहेत. यात त्यांच्यासोबत प्रसिद्ध प्रमुख म्हणून ताहीर बेग मिर्झा असणार आहेत.

# राष्ट्रीय एकात्मता साधत छत्रपती संभाजी चौकात सर्वधर्मीय गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------

राष्ट्रीय एकात्मता साधत छत्रपती संभाजी चौकात सर्व जाती धर्मातील गुणवंत एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. सिन्नर शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक तसेच काजीपुरा परिसरातील शोषित,पीडित,वंचित,दुर्लक्षित, कष्टकरी, शेतकरी, झोपडपट्टी भागातील एस.एस.सी.गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार महामित्र परिवाराच्या वतीने येथील संभाजी चौकात संपन्न झाला. छत्रपती संभाजी महाराजांच्या ३६८ व्या जयंतीचे औचित्य साधत विद्येची देवता क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले व आद्यशिक्षिका फातिमा शेख यांच्या प्रतिमेस गुणवंत विद्यार्थिनींनी पुष्पमालेने मानवंदना देऊन क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले, फातिमा शेख, महात्मा फुले, यांचा जय जयकार केला. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा फुले, राजश्री शाहू महाराज, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे बहुजन समाज सर्व क्षेत्रात प्रगतीपथावर आहे, राष्ट्रीय एकात्मता याची आज देशाला अत्यंत गरज आहे आणि आजचा सत्कार सोहळा हा आदर्शव्रत असा आहे. संयोजकांनी कार्यक्रम पत्रिकेत आणि बॅनरवर सावित्रीमाई फुले आणि फातिमा शेख यांच्या समवेत कर्नल सोफिया कुरेशीआणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांची छायाचित्रे लावून समाजापुढे एकात्मतेचा संदेश दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जमिर सैय्यद सर यांनी केले, सूत्रसंचालन स्वप्निल वायचळे यांनी केले तर आभार प्रदर्शन संतोष कुरणे मानले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महामित्र दत्ता वायचळे होते.






विद्यार्थ्यांच्या घरात शैक्षणिक वातावरण नसताना मिळवलेल्या यशाचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे अश्या सर्व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी मी स्वतः आणि महाराष्ट्र एस टी कामगार सेना सर्वतोपरी मदत करण्यासाठी सदैव तत्पर आहोत आश्वासन मी या ठिकाणी देतो.

**श्री. देवाभाऊ सांगळे,**
**कामगार नेते, महाराष्ट्र एस टी कामगार सेना नाशिक विभाग**

विचार मंचावर ज्येष्ठ शिक्षक जे.आर. गीते सर, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते हाजी गुलाबभाई सैय्यद, प्रकाश भाटजिरे, कॉम्रेड हरिभाऊ तांबे, भाऊसाहेब पवार, सुनिल कुऱ्हे सर, पी.एल. गोळेसर, युवा उद्योजक उदय गोळेसर, बांधकाम व्यावसायिक योगानंद गवळी, परिवहन महामंडळाचे देवाभाऊ सांगळे, किरण गवळी, दिपक भाटजिरे आदी उपस्थित होते.सुनिल कुऱ्हे सर यांनी विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील करिअर संबंधितल्या संधीबद्दल माहिती देऊन त्या पद्धतीने अभ्यास करून यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या तसेच गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी* सोडविण्यासाठी सदैव तत्पर असल्याचे आश्वासन दिले. कॉम्रेड हरिभाऊ तांबे यांनी अधिकारी होऊन सर्वसामान्यांसाठी निस्वार्थ सेवा करण्याचे आवाहन केले. युवा उद्योजक उदय गोळेसर यांनी मुलींचे शिक्षणातील उत्तीर्णतेचे प्रमाण जास्त असल्याने विशेष आनंद होत असल्याचे सांगितले आणि मुलींच्या शिक्षणासाठी, गणवेषासाठी मदत करण्याचे आश्वासन दिले. सौ.रोहिणी कुरणे यांनी मुलींच्या शैक्षणिक विकासामध्ये पालकांचा मोलाचा वाटा असल्याचे सांगून विद्यार्थिनींनी विशेष नैपुण्य मिळवल्याबद्दल कौतुक केले. श्री.भाऊसाहेब पवार यांनी धोंडविनगर सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थी अक्षय विलास पवार खडतर परिश्रम घेऊन जिल्हाधिकारी पदापर्यंत पोहोचल्याचे उदाहरण दिले. गुणगौरव समारंभाचे अध्यक्ष महामित्र दत्ता वायचळे यांनी दहावीच्या टक्केवारीची हवा डोक्यात जाऊ न देता आणि मोबाईलचा आवश्यक तेवढाच वापर करून सावित्रीमाई फुले आणि प्रतिमा शेख यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून निवडलेल्या क्षेत्रात उत्तुंग भरारी घेण्याचे आवाहन केले. सोबतच पितृछत्र हरवलेल्या आणि अतिशय प्रतिकुल परिस्थितीत शिक्षण घेऊन बारावी विज्ञान शाखेत तालुक्यात प्रथम आलेल्या सानिया इम्रान खतीब या विद्यार्थ्यांनीचे विशेष कौतुक केले. याप्रसंगी खालील दहावीतील गुणवंत विद्यार्थी कु. जुल्फीन जमिर सैय्यद, कु. अनन्या गणेश मुटके, कु.ऋतुराज किरण भाटजिरे, कु. भूमी संतोष कुरणे, कु. अक्षदा राजेंद्र गोळेसर, कु. आर्या विलास भाटजिरे, कु. स्वदेश दत्तात्रय मुंढे, कु. साक्षी रामदास करडग, कु. प्रणव योगानंद गवळी, कु. वेदिका उज्ज्वल भाटजिरे, कु. मल्हार मंगेश गोळेसर, कु. यशराज मच्छिंद्र वायचळे, कु. सानिया इम्रान खतीब यांचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी रामदास करडग, भरत जगताप, वसीम खतिब, श्री. योगेश मुटके, श्री. रमेश भाटजिरे, श्री. साहिल शेख, श्री.गणेश मुटके, श्री. विलास भाटजिरे, मच्छिंद्र वायचळे, कु. आभिषा वायचळे, सौ.दुर्गा मुटके, रोहिणी भाटजिरे, सौ.शितल करडग, अनिता वायचळे, इंदुबाई कुरणे, जयश्री भाटजिरे, चैताली कुरणे, हौशाबाई कुरणे, सौ. परवीन सैय्यद, सोनाली मुटके, सौ.कांचन मुटके, सौ.रजिया सैय्यद, प्रमोद मुटके, अक्षय कुरणे, सुरेश कुरणे, दत्तात्रय मुंढे, प्रवीण भाटजिरे, धनंजय(नाना) जाधव, अभिषेक वायचळे, हनुमान गोळेसर, रामा गोळेसर, महेंद्र सांगळे, दीपक मुंडे, संतोष उगले, सुरेश हुडे, रामा जगताप, विकी शिंदे, आकाश पोपळघट, श्याम मिठे, शौकतभाई सैय्यद. सर्वांना मिठाई भरून आणि शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.



आमचे मित्र व देवाज् ग्रुप चे सदस्य श्री. रतन कुमावत यांचे चिरंजीव कुमार रितेश रतन कुमावत यास एसएससी परीक्षेत ९३.६० इतक्या उच्चांकाणे उत्तीर्ण झाल्या बद्दल देवाज् ग्रुपच्या वतीने सत्कार करताना सर्व मित्र परिवार

# श्री गिरीश महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त सटाणा येथे मोफत औषध वाटप शिबिर

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------

महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री श्री.गिरीश महाजन यांच्या वाढदिवसानिमित्ताने भाजपा जिल्हा चिटणीस ॲड सौ रूपाली धिरज पंडित यांच्या नेतृत्वाखाली सटाणा बस स्टॅन्ड येथे मोफत हिमोग्लोबिन चेकअप व मोफत औषधे वाटप शिबिर आयोजित करण्यात आले होते. तसेच यावेळी कार्यक्रमाप्रसंगी भाजपाचे प्रदेश निमंत्रित सदस्य डॉक्टर विलास बच्छाव अध्यक्षस्थानी होते , प्रमुख पाहुणे सटाणा कृषी बाजार समितीचे नवनिर्वाचित संचालक राहुल केदा सोनवणे भाजपाच्या जिल्हा परिषद सदस्य लताताई बच्छाव, सौ मीनाताई मोरे, सौ साधनाताई गवळी, तसेच पंचायत समिती उपसभापती सौ ज्योतीताई अहिरे, भाजपा ज्येष्ठ नेते प्रदीप जैन, अतुल पवार, जगदीश मुंडावरे, दिलीप (भोला) अहिरे, नितीन बागड भाजपा सरपंच धनंजय पवार, खुशाल मोरे, किरण अहिरे सर, तसेच सामाजिक क्षेत्रात काम करणारे शाम बगडाने, मुन्ना सोनवणे, वसंत गवळी, ओम कापडणीस, राजेंद्र गवळी, तसेच महिला पदाधिकारी शालिनीताई कापडणीस, पूजाताई पवार, धनश्री सोनवणे, मयुरी पवार, गौरव( विकी )देवरे, प्रेम दादा मगर, स्वप्निल सावकार, आदींसह भाजपा पदाधिकारी यांचे सहकार्य लाभले.तसेच सटाणा डेपोचे डेपो मॅनेजर राजेंद्र अहिरे व त्यांची संपूर्ण टीम या कार्यक्रमास उपस्थित होते.



# राज्यमार्ग सहावरील खड्ड्याकडे बांधकाम विभागाचे दुर्लक्ष खड्ड्यात वृक्षारोपण करत कॉंग्रेसचे आंदोलन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------

अमळनेर शहरातून जाणाऱ्या मुख्य राज्यमार्ग क्रमांक ६ वर भला मोठा खड्डा पडला असून बांधकाम विभागाने अनेक तक्रारी करूनही त्याकडे दुर्लक्ष केल्याने अखेर कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी यात वृक्षारोपण केले. व खड्डे त्वरीत बुजवण्याची मागणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे. अमळनेर शहरातूनच राज्यमार्ग ६ जातो.मात्र मागील काही महिन्यांपासून अमळनेर कडून बेटावद कडे जातांना अनेक ठिकाणी रस्ता खराब झाला आहे.त्यातच शहरातून जाणाऱ्या या रस्त्यावर अजय केले यांच्या घराजवळ वळणावरच खूप मोठ्ठा खड्डा पडलेला असून वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. वाहने खड्ड्यात पडून वाहनांचे नुकसान होत आहे. याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाले आहे. अमळनेर ते शिरपूर, शिंदखेडा, नंदुरबार या भागाकडे जाण्यासाठी या रस्त्याचा वापर करतात. दिवसाला हजारो वाहनधारक या रस्त्याने ये-जा करत असतात.मागील ४ - ५ दिवसापासून सुरू असलेल्या पावसाने रस्त्यावरील हा खड्डा भरला असून या ठिकाणी अपघात देखील झाले आहेत. रस्त्याला वर्ष ही पूर्ण झाले नसून ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम केले असल्याचे पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. या राज्यमार्गावर कोट्यवधी रुपये खर्च झाले असून ठेकेदाराला मेंटेनन्स कालावधी दिलेला असतो. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता ठेकेदारचे दोष झाकून नागरिकांना त्रास होऊ देत आहेत. हा खड्डा पावसाळ्याआधी बुजविण्यात यावा यासाठी कॉंग्रेस तर्फे उपहासात्मक वृक्षारोपण आंदोलन करण्यात आले,तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन देखील देण्यात आले.यावेळी तालुकाध्यक्ष बी. शहराध्यक्ष मनोज पाटील, संदीप घोरपडे,बन्सीलाल भागवत,शरद पाटील,गजेंद्र साळुंखे, के. व्हि. पाटील, प्रताप पाटील, दिलीप पाटील, पी. वाय पाटील,तुषार संदानशिव, भगवान संदानशिव, विठ्ठल पवार,प्रमोद पाटील,राजू भाट,बापुराव पाटील,मोहम्मद तेली,मनोहर पाटील,विलास पाटील तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# शेतकरी बांधवांची व्यथा "कांद्याची रडकथा"

## श्री संजय बच्छाव. महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना साक्री ता. उपाध्यक्ष

श्री प्रवीण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



कांदा हे १००% बे भरवशाचे पिक आहे, निसर्गाच्या लहरीपणा व अवक्रुपेमुळे कांद्याच्या उत्पादनावर परिणाम होत असतो, अवकाळी पाऊस नुकसान भरपाई तात्काळ उपलब्ध करून दिली पाहिजे कांदा विमा दर दोन तीन वर्षांत आलटून पालटून कांदा कधी रडवणार तर कधी, कधी थोडं फार हसवतोही या वर्षी थोढी खुशी ज्यादा गम अशी अवस्था कांदा उत्पादक शेतकऱ्यांची होण्याची शक्यता अधिक आहे, परतीचा पाऊस आणि अवकाळीचा तडाखा कांदा पिकाला बसला आहे, दोन, दोन, तिन वेळा रोपं टाकले, त्यामुळे बहुतांश लागवड उशिरा झाली, त्यातच जानेवारी, फेब्रुवारीत कांदा लागवडीसाठी शेतकऱ्यांनी एकच गर्दी केली, त्यामुळे मजुर टंचाईला सामोरे जावे लागले, मजुरांची चांदी झाली, ते ट्रकर, पिक अप सोडून ऐसी गाडीत बसून कांदा लागवड करण्यासाठी जाउ लागले, या रब्बी हंगामात थंडी कमी उन अधिक असल्याने उन्हाळ कांद्याला पोषक वातावरण अजिबात

नव्हतं, अतिउस्नतेमुळे कांदा वाढीवर विपरीत परिणाम झाला, एप्रिल महिन्यात काढलेल्या कांद्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घटले, करपा रोगामुळे एकुण उत्पादनात मोठी घट निर्माण झाली, शेवटच्या आठवड्यात अवकाळी पावसाने जबरदस्त नुकसान केले, उष्णतेच्या लाटेमुळे कांद्याची साइज कमी झाली, काढण्यापूर्वीच कांद्याला चटका बसल्याने तो चाळीत फार दिवस टिकनार नाही, पिंपळनेर, दहिवेल, सामोडे, तसेच पश्चिम पट्ट्यात पंधरा वीस दिवसातच तो सडु लागला आहे, दहिवेल परिसरात किमान दिड लाख हेक्टरवर उन्हाळी कांद्याची लागवड होती, त्यातील ५० % क्षेत्रावर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला आहे, त्यामुळे एकुण उत्पादनात ३० ते ३५% घट झाली असावी असा अंदाज आहे,त्यासंदर्भात अधिक्रुत आकडेवारी उपलब्ध नाही, मागिल वर्षी दोन्ही हंगामात निर्यात बंदी घालण्यात आली त्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा मोठा फटाका सहन करावा लागला, सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आखाती देशांतील शेतीमालाच्या आयात निर्यातिवर होइल त्यामुळे कांदा निर्यात घटण्याची शक्यता नाकारता येत नाही, कांदा दिर्घकाळ ठीकनार नसल्याने आक्टोबर नोव्हेंबरमध्ये उन्नाळ कांद्याला तेजी राहिल असे काही व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे, त्यामुळे कांद्याची विक्री हात राखून करावी, * नाफेड आणि एन सीसी एफला जर कांदा खरेदी करायचीच असेल* तर या दोन्ही संस्थांनी थेट बाजार समित्यांमध्ये खरेदी करण्यात यावी अशी जाहीर मागणी भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा प्रदेश महामंत्री शेतकरी मित्र बिंदूशेठ शर्मा व महाराष्ट्रा राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्या पदाधिकारी बांधवांना च्यायला मागणी नुसार किसान मोर्चा मागणी करीत आहे.

# साक्री पोलीस ठाण्यामध्ये सायबर सेल स्थापन करा साक्री तालुक्यातील नागरिकांची मागणी

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

साक्री तालुक्यातील नागरिकांना मोबाईल हॅक झाल्यास किंवा इतर सायबर गुन्ह्याची तक्रार देण्यासाठी तब्बल पन्नास किलोमीटर अंतर पार करून धुळे येथील सायबर सेलला जावे लागते. त्यामुळे गैरसोय होत असल्याने साक्री पोलीस ठाण्यात सायबर सेल ची स्थापना करावी अशी मागणी तालुक्यातील नागरिकांची होत आहे. डिजिटल युगात सायबर गुन्ह्याचे प्रमाण वाढले आहे. मोबाईल हॅकिंग, ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडियाचा गैरवापर यासारख्या घटनांमुळे नागरिक त्रस्त आहेत. साक्री तालुका ग्रामीण असून येथील नागरिकांना सायबर गुन्ह्यामध्ये तक्रार देण्यासाठी थेट धुळे येथे जावे लागते त्यामुळे त्यांच्या वेळ आणि पैसा खर्च होतो अनेकदा तातडीने तक्रार करणे शक्य न झाल्यास गुन्हेगारांना पळून जाण्यास वाव मिळतो. साक्री पोलीस ठाण्यात सायबर सेल नसल्यामुळे पोलिसांनाही सायबर गुन्ह्याचा तक्रारीसाठी धुळे येथील सायबर पथकावर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे साक्री पोलीस ठाण्यात स्वतंत्र सायबर सेल्स ची स्थापना करावी अशी मागणी होत आहे.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

